**प्रकल्प प्रवर्तक मे. सत्यजित एन्वायरो सोल्युशन्स, गट क्रमांक ६५/२अ/१, वेळापूर, वेळापूर-सांगोला रोड, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित सामुहिक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा प्रकल्प (Common Bio-Medical Waste Treatment & Disposal Facility – CBMWTDF) स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्त -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. सत्यजित एन्वायरो सोल्युशन्स, गट क्रमांक ६५/२अ/१, वेळापूर, वेळापूर-सांगोला रोड, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित सामुहिक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा प्रकल्प (Common Bio-Medical Waste Treatment & Disposal Facility – CBMWTDF) स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक करणे जाहिर जनसुनावणी मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थळ गट क्रमांक ६५/२अ/१, वेळापूर, वेळापूर-सांगोला रोड, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र, येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. निखील मोरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मनिषा कुंभार, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. प्रशांत गायकवाड, प्रतिनिधी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या



निखीलमोरे

दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मे. सत्यजित एन्वायरो सोल्युशन्स, गट क्रमांक ६५/२अ/१, वेळापूर, वेळापूर-सांगोला रोड, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांचा त्यांच्या प्रस्तावित सामुहिक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा प्रकल्प (Common Bio-Medical Waste Treatment & Disposal Facility – CBMWTDF) स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक ०२-११-२०२३ रोजी अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग बी ७ (डीए) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता (TOR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी

ऑनलाईन अर्ज दिनांक ०२-०८-२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक ०३-०८-२०२३ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी मंगळवार , दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी १२. ०० वाजता घेण्यास मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ११३ /२०२४ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२४०२१३ एफटीएस -०१३६ दिनांक -१३-०२-२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| **२)** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी –<br>प्रादेशिक अधिकारी -पुणे,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>पुणे | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>सोलापूर | - | **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक संचार यात मराठीत व वृत्तपत्र दैनिक दिव्य मराठी यात इंग्रजीत दिनांक २०-०१-२०२४ रोजी जनसुनावणीबाबत प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर,

५) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, तालुका-माळशिरस, जिल्हा- सोलापूर,

६) तहसीलदार, तहसील कार्यालय - माळशिरस, तालुका- माळशिरस, जिल्हा- सोलापूर,

७) ग्रामपंचायत कार्यालय- मौजे वेळापूर, खंडाळी, निमगाव, मळोली, दत्तनगर, बोंडले, तांदुळवाडी, धानोरे, शेंडेचिंच, तोंडले या गावांशी संबधित ग्रामपंचायत कार्यालये, तालुका- माळशिरस, जिल्हा- सोलापूर,

८) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

९) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१०) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ३ रा मजला, जोग सेंटर, जुना मुंबई-पुणे रस्ता, वाकडेवाडी, पुणे - ४११ ००३

११) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, ब/४, बाळी बिल्डिंग, सिव्हिल लाईन्स, शासकीय दूध डेअरीसमोर, सात रस्ता, सोलापूर - ४१३ ००३

१२) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांना लेखी निवेदने/पत्रे/तक्रार अर्ज प्राप्त झालेले नाहीत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की, ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली. माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण

सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सदरहू प्रस्तावित सामुहिक जैव-वैद्यकीय कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा प्रकल्पात एकूण गुंतवणूक ही २.४७ कोटी आहे. सदरहू प्रकल्पाचे कार्यक्षेत्र हे माळशिरस, पंढरपूर आणि सांगोला हे तालुक्यापुरते आहे. प्रस्तावित प्रकल्पाच्या अंतर्गत माळशिरस, पंढरपूर आणि सांगोला तालुक्यातील आरोग्य सेवा आस्थापनांमधील सुमारे ६,८८६ बेड्ससाठी ही सुविधा पुरविण्यात येईल.

प्रकल्पातील वाहनांसाठी जीपीआरएस सिस्टीम, तर प्रकल्पात ईटीपी व प्रकल्पातील चिमणीसाठी ओसीएमएस सिस्टीम व बारकोड सिस्टिम कार्यान्वित करण्यात येणार आहे. प्रकल्पातील घातक घन कचरा ही अधिकृत सामुहिक घातक कचरा प्रक्रिया केंद्रामध्ये पुढील प्रक्रियेसाठी पाठविण्यात येईल.

सदरहू सामुहिक जैव वैद्यकीय प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा प्रकल्पात (CBMWTF) दुर्गंधी व्यवस्थापन हा एक महत्वाचा पैलू आहे. दुर्गंधी स्त्रोत हे लोडींग, अनलोडिंग, अधिक काळापेक्षा -४८ तासांपेक्षा जास्त कचरा साठवणूक आणि अयोग्य हाऊसकीपिंगमुळे होऊ शकते. त्यासाठी जैव वैद्यकीय कचरा निर्मिती व प्रक्रिया यामधील वेळ ४८ तासांपेक्षा जास्त नसेल. दुर्गंधी निर्माण होणा-या क्षेत्राभोवती हरित पट्टा विकसीत केला जाईल. वाहने, कंटेनर आणि स्टोअर रुम वारंवार (दिवसातून एकदा) निर्जंतुकीकरण केले जाईल. शासनाच्या धोरणांनुसार प्रकल्पातील ३३% क्षेत्रावर हरित पट्टा विकसित करण्यात येईल.

प्रकल्पात रुफटॉप हार्वेस्टींगव्दारे ३३३.० घनमीटर पावसाचे पाणी ३५०.० घनमीटर टाकीमध्ये साठविले जाईल. सदरहू पाणी हे आग नियंत्रण करण्यासाठी साठवणूक टाकीमध्ये वापरे जाईल.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी भांडवली खर्च ८२.० लाख, तर वार्षिक देखभाल दुरुस्तीसाठी १८.० लाख राखीव निधि ठेवण्यात आलेला आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, उपस्थितांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करत आहे. सूचना, निवेदन, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविताना आपले संपूर्ण नांव व गावाचे नांव सांगण्याची सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री. रमेश विलास कणसे, मुक्काम पोस्ट -पिसेवाडी, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

आपल्या प्रकल्पासाठी आपण जो जैव-वैदकीय कचरा/वेस्ट ६,८८६ बेड्सचा गोळा करणार आहेत, तर त्याचे दैनंदिन संकलन (Collection) किती असेल, तसेच प्रकल्पाची दैनंदिन प्रक्रिया करण्याची क्षमता किती असेल, प्रकल्पात दैनंदिन किती राख तयार होईल?

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सदरहू प्रकल्प हा ६,८८६ बेड्ससाठी सुविधा पुरविण्यासाठी आहे. प्रत्येक बेड्सचा जैव-वैदकीय कचरा हा सुमारे २५०.० ग्रॅम प्रति दिन असणार आहे. म्हणजे दर दिवशी २५० ग्रॅम X ६,६८६ बेड्स - १७,२१,५०० किलोग्रॅम प्रति दिन, म्हणजे सुमारे १.७ मेट्रिक टन प्रति दिन एवढा जैव वैदकीय कचरा मिळेल. त्यावर प्रक्रिया करण्यात येईल.

प्रकल्पाची क्षमता ही १.८ मेट्रिक टन प्रति दिन एवढी आहे.

प्रकल्पात जैव वैदकीय कच-यावर प्रक्रिया केल्यानंतर इन्सिनरेशन राख ही सुमारे ६०.० मेक्ट्रीक टन प्रति वर्ष उत्पन्न् होईल. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या निर्देशांनुसार सदरहू राख ही अधिकृत सामुहिक घातक कचरा प्रक्रिया केंद्रास (CHWTSDF) पुढील प्रक्रियेसाठी हस्तांतरित करण्यात येईल.

२) **<u>श्री. दीपक धर्माजीराव मानेदेशमुख, राहणार- वेळापूर शिरी, तालुका- माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रकल्पातून निघणा-या वेस्टचे जे पाणी आहे, त्याचे आपण काय करणार याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, कोणत्याही प्रकल्पास पाणी हे लागते, त्याशिवाय प्रकल्प चालविता येतच नाही. या प्रकल्पात ७.५ घनमीटर प्रति दिन पाणी लागणार आहे. त्यापासून घरगुती सांडपाणी हे ०.८ घनमीटर हे निर्माण होईल, तर औद्योगिक सांडपाणी हे ४.० घनमीटर निर्माण होईल एकूण ४.८ घनमीटर प्रतिदिन सांडपाणी निर्माण होणार आहे. घरगुती सांडपाण्यावर एस.टी.पी.त प्रक्रिया करण्यात येईल, तर औद्योगिक सांडपाण्यावर ईटीपीत प्रक्रिया करण्यात येऊन सर्व सांडपाण्याचा प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्प ही झेडएलडी - शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प आहे.

३) **<u>श्री. दीपक तानाजीराव जगताप, राहणार - वेळापूर ,तालुका - माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-</u>**

सदरहू प्रकल्पामुळे हवा प्रदूषण व ध्वनी प्रदूषण निर्माण होईल. त्यामुळे परिसरातील लोकांना काय त्रास होईल?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, प्रकल्पात इन्सिनरेटर आणि डी. जी. सेट हे दोन हवा प्रदूषणाचे स्त्रोत आहेत. इन्सिनरेटरसाठी ३०.० मीटर उंचीची चिमणी आणि क्वेंचर, चिलर, व्हेंचुरी स्क्रबर, सायक्लोनीक ड्रॉपलेट सेपरेटर हे कार्यान्वित करण्यात येतील.

तर डी.जी. सेटला ५.० मीटर उंचीची चिमणी कार्यान्वित करण्यात येणार आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेली हवा प्रदूषण मानके ही पाळण्यात येतील. त्यामुळे प्रकल्पामुळे हवा प्रदूषणाचा त्रास हा परिसरातील लोकांना होणार नाही.

या प्रकल्पात महत्वाचा भाग आहे दुर्गंधी व्यवस्थापन. तर ४८ तासांपेक्षा जास्त जैव-वैदकीय कचरा ठेवल्यास त्यास दुर्गंधी येते. त्यासाठी जैव-वैदकीय कचरा संकलन करताना वाहने बंधिस्त राहतील. द्रव गळती टाळण्यासाठी जैव-वैदकीय कचरा संकलन वाहने ही लीक प्रुफ राहतील. तसेच जैव-वैदकीय कचरा निर्मिती व प्रक्रिया यांमधील वेळ ४८ तासांपेक्षा जास्त नसेल. तसेच प्रकल्पात वेळोवेळी निलगिरीचा शिडकाव करण्यात येईल.

४) **<u>श्री. दिनेश जालिंदर जाधव, राहणार - मळोली, तालुका - माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-</u>**

माझे दोन प्रश्न आहेत - पहिला प्रश्न या प्रकल्पास एकंदर किती खर्च येईल? त्याचप्रमाणे प्रकल्प प्रक्रियेत जी राख (Ash) उत्पन्न होईल, ती परिसरातील शेतक-यांना शेतात खत म्हणून टाकण्यासाठी उपलब्ध करण्यात येईल काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, या प्रकल्पात २.४७ कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. तसेच प्रकल्पात जी राख (Ash) उत्पन्न होईल ती केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या निर्देशांनुसार सदरहू राख ही अधिकृत सामुहिक घातक कचरा प्रक्रिया केंद्रास (CHWTSDF) पुढील प्रक्रियेसाठी हस्तांतरित करण्यात येईल. निर्देशांप्रमाणे या प्रकल्पातील कुठलाही प्रक्रिया केलेला कचरा हा दुस-यास हस्तांतरित करता येत नाही, तर फक्त अधिकृत सामुहिक घातक कचरा प्रक्रिया केंद्रास (CHWTSDF) पुढील प्रक्रियेसाठी हस्तांतरित करण्यात येते.

**५) श्री. सचिन शिवाजी गायकवाड, राहणार-दसूर तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

या प्रकल्पात संकलित केलेल्या आणि प्रक्रियेसाठी आणलेल्या जैव-वैदकीय कच-यामुळे परिसरात दुर्गंधी पसरू शकते. त्यासाठी प्रकल्प प्रवर्तक काय उपाययोजना करणार आहेत?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की, या प्रश्नाचे उत्तर हे अगोदर देण्यात आलेले आहे. सामुहिक जैव वैद्यकीय प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा प्रकल्पात (CBMWTF) दुर्गंधी व्यवस्थापन हा एक महत्वाचा पैलू आहे. दुर्गंधी स्त्रोत हे लोडींग, अनलोडिंग, अधिक काळापेक्षा -४८ तासांपेक्षा जास्त कचरा साठवणूक आणि अयोग्य हाऊसकीपिंगमुळे होऊ शकते. त्यासाठी जैव वैद्यकीय कचरा निर्मिती व प्रक्रिया यामधील वेळ ४८ तासांचा जास्त नसेल. दुर्गंधी निर्माण होणा-या क्षेत्राभोवती हरित पट्टा विकास केला जाईल. वाहने, कंटेनर आणि स्टोअर रुम वारंवार (दिवसातून एकदा) निर्जंतुकीकरण केले जाईल. शासनाच्या धोरणांनुसार प्रकल्पातील ३३% क्षेत्रावर हरित पट्टा विकसित करण्यात येईल. त्यामुळे तेथील हवा ही खेळती राहिल. प्रकल्पात जैव-वैदकीय कच-याची साठवण (storage) करण्यात येणार नाही. तसेच दुर्गंधी निर्माण होणा-या क्षेत्राभोवती सेंद्रीय आणि बायोडिग्रेडेबल केमिकल फवारणी करण्यात येऊन दुर्गंधी ही नियंत्रणात आणण्यात येईल. प्रकल्पातील कामगारांना योग्य आणि पुरेसे पीपीई उपलब्ध करण्यात येतील.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, उपस्थितांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीतर्फे प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करण्यात येत आहे. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीतर्फे प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्याची

पुरेशी संधि उपस्थितांना देण्यात आलेली होती. त्यांनी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना दोन शब्द बोलण्याची विनंती केली.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, त्या जिल्हादंडाधिकारी यांच्या वतीने अपर जिल्हादंडाधिकारी म्हणून उपस्थित असून बैठकीस उपस्थित असलेल्या परिसरातील सर्व ग्रामस्थांचे, तालुक्याच्या प्रांताधिकारी सौ. पांगारकर मॅडम, शासकीय आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी यांचे स्वागत केले. त्यांनी सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पाबाबत प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणात संपूर्ण माहिती व पर्यावरण व्यवस्थापन योजना सांगितलेली आहे. त्यानंतर उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबत प्रश्न, आक्षेप नोंदविले असून त्यास पर्यावरण सल्लागार यांनी त्यांचे निरसनसुध्दा केलेले आहे. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्याचे असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. लेखी निवेदन, सूचना वा आक्षेप आताही नोंदवू शकता असे त्यांनी सांगितले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना पुरेशी संधि देण्यात आल्याचे जाहिर केले. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जनसुनावणी प्रक्रिया पूर्ण झाल्याचे जाहिर केले.

बैठकीचा समारोप करताना आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सोलापूर जिल्ह्याच्या अपर जिल्हादंडाधिकारी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रतिनिधी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी व परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी यांचे बैठकीत उपस्थित राहून प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल सर्वांचे आभार मानले आणि मा. अध्यक्षा यांच्या वतीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले

मा. अध्यक्षा यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

लेखी निवेदने/पत्रे/तक्रार अर्ज प्राप्त झालेले नाहीत.

**(निखील मोरे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
सोलापूर

**(प्रशांत गायकवाड)**
प्रतिनिधी,
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी-पुणे
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
पुणे

**(मनिषा कुंभार)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर
जिल्हा - सोलापूर